# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्र क ट न ।।

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत....**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने दि. ०३/१०/२०१९ ते २३/१०/२०१९ तसेच व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. २४/१०/२०१९ ते ३१/१०/२०१९ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि. ०१/११/२०१९ ते ०८/११/२०१९ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन आणि व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ) नियमित शुल्कासह → | गुरुवार दि. ०३/१०/२०१९ ते शुक्रवार दि. १५/११/२०१९ | शुक्रवार दि. ०१/११/२०१९ ते मंगळवार दि. २६/११/२०१९ |
| ब) विलंब शुल्कासह → | शनिवार दि. १६/११/२०१९ ते सोमवार दि. २५/११/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | |

अ) **उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख = गुरुवार दि. २८/११/२०१९**

ब) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी **Pre-list Print** करुन विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर **Pre-list** चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. **विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन Save होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या link वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.**

२. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करावयात.

३. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

दिनांक - २२/१०/२०१९

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे - ०४